मूल्य ₹१५/-

# हसती दुनिया (मराठी)

अंक १ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • जानेवारी - २०१९



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक १ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • जानेवारी २०१९

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर


संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९




## कथा


- वन प्रस्थान ०६
- यथा राजा तथा प्रजा ०८
- जोतीची प्रतिज्ञा १४
- दृढ भक्ती २०
- बुद्धांचा उपदेश ४२
- प्रयत्नांती परमेश्वर ४८







## स्तंभ



- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- दत्तात्रय रा. कापरेकर ०५
- राष्ट्रीय प्रतिज्ञेचे जनक २१
- नेताजी सुभाषचंद्र बोस २२
- सावित्रीबाई फुले २७
- दुर्गभ्रमंती २९
- आपले जिल्हे - भंडारा ३०
- समर्थ दर्शन -५१ ३४
- तेजस्विनी -८१ ४०
- पक्षीजगत ४७








## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६





## कविता


- जय हिंद ४१
- संत समागम ४५

दोन शब्द

# सत्कर्म आणि आभार

राजूची आई त्याला रोज सत्संगाला घेऊन जात असे. एके दिवशी त्याने प्रवचनात ऐकले, की ईश्वराचे आपण नेहमी आभारच मानावे. घरी आल्यावर त्याने आईला विचारले, "आई, आपण ईश्वराचे आभार का मानायचे? ईश्वरानं आपल्याला काय दिलंय? दिनूकडे तर किती छान-छान कपडे, खेळणी आहेत. मोठ्ठ घर आहे. त्याचे बाबा तर त्याला रोज गाडीतून शाळेत सोडतात."


आईने राजूचं सगळं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं. त्याला जवळ घेत आई म्हणाली, "बाळ, घरामध्ये आई-बाबा आपल्या मुलांची काळजी घेतात. आपल्या मुलांमध्ये ते कधी भेदभाव करतात का? नाही. सारी मुलं त्यांना सारखीच प्रिय असतात. तसा ईश्वरही आपल्या लेकरांवर सारखंच प्रेम करतो. भेदभाव करत नाही...." आईचं बोलणं मध्येच थांबवत तो म्हणाला, "....मग कुणाला कमी कुणाला जास्त का देतो?" राजूच्या प्रश्नावर आई हसली व म्हणाली, थांब! सद्गुरु बाबाजींनी तुझ्या प्रश्नाचं उत्तर देऊन ठेवलंय ते तुला सांगते. आईने गुरसिख पुस्तकातील उदाहरण देताना सांगितले, "एका घरात पाच भावंडं राहात होती. एकदा त्यांच्या आईने सर्वांच्या आवडीचं उडदाच्या डाळीचं वरण बनवलं. वरण खूपच चविष्ट होतं. आईनं सर्वांना जेवायला वाढलं. आपल्या चारही मुलांना आईने उडदाचं वरण वाढलं; पण धाकट्याला मात्र मूगडाळीचं साधंच वरण वाढलं. धाकटा मुलगा खूप रागावला, चिडला. आईकडे उडदाच्या वरणासाठी हट्ट करु लागला, रडू लागला; पण आईने त्याला उडदाचं वरण मुळीच दिलं नाही." "का? आईला तो आवडत नव्हता का?" राजूने मध्येच विचारले. "नाही बाळ तोही तिचा लाडकाच होता; पण तिला त्याची खूप खूप काळजी वाटत होती. कारण तो आजारी असल्याने खूप अशक्त झाला होता. त्याला उडदाची डाळ पचणार नाही. त्याच्या तब्येतीसाठी हानीकारक आहे, हे तिला ठाऊक होतं. म्हणून त्याची खूप दया येत असूनही तिनं त्याला उडदाचं वरण दिलं नाही. आता मला सांग, आई दुष्ट होती का? आईनं आपल्या मुलांमध्ये भेदभाव केला का?" राजू मान डोलावत म्हणाला, "नाही." आई पुढे म्हणाली, "तसं ईश्वरदेखील आपल्याला रुचेल ते न देता पचेल तेच देत असतो. आपल्या हिताचं असेल तेच देतो. ईश्वर हा न्यायी आहे. कुणावर अन्याय करत नाही. परंतु आपल्या हातून घडलेल्या चुकीच्या कर्मामुळे आपण काही गोष्टींपासून वंचित होतो. त्यात ईश्वराचा काय दोष? उलट त्याने कोणताही मोबदला न घेता आपल्याला हा सुंदर देह दिलाय. देहासाठी हवा, पाणी, अन्न-वस्त्र पुरवलीत. ही सुंदर धरती राहण्यासाठी दिली. बुध्दी आणि शक्ती दिली. मग आपण ईश्वराचे आभार नको का मानायला?" आपल्या दु:खांपेक्षा इतरांचं दु:ख पाहावं. काय मिळालं नाही ते पाहण्यापेक्षा जे मिळालय त्यात आनंद मानावा आणि सर्वांच्या उपयोगी पडावं.

मित्रांनो, नवीन वर्षात पदार्पण करताना आपण काय गमावलं याचं दु:ख न करता जे मिळालय त्याबद्दल ईश्वराचे आभारच मानू या आणि ते टिकवण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न करु या.

सत्कर्म योगे वय घालवावे।
सर्वांसाठी मंगल बोलवावे।।

- राजेंद्र थोरात..





# दत्तात्रय रामचंद्र कापरेकर

मित्रांनो, गणित वाचताच तुमच्या कपाळावर आठ्या आल्या असतील किंवा डोळ्यासमोरुन आकड्यांची गाडी धावत गेली असेल. मात्र हेच गणित अगदी लोकलच्या गर्दीतही सोडविणारे एक गणितज्ज्ञ होऊन गेले. दत्तात्रय रामचंद्र कापरेकर असे त्यांचे नाव. सतत गणिताचा विचार करणारे कापरेकर हे १९२३ मध्ये रोज डोंबिवली ते आत्ताचे मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपर्यंतचा लोकलचा प्रवास करत असत. हा प्रवास करत असताना त्यांचे लक्ष वाटेत दिसणाऱ्या आगगाडीच्या डब्यांच्या नंबरांकडे असे. या आकड्यांचा विचार करताना कापरेकरांना नवीनच प्रकारच्या संख्येचा शोध लागला. ही संख्या म्हणजे अशी संख्या ज्याचा मधला अंक हा बाजूच्या अंकाची बेरीज असते. उदा. १२१, ३४१, १८७ इत्यादी. डोंबिवली स्टेशनच्या नावावरुन कापरेकरांनी या संख्यांना डोम्लो संख्या असे नाव दिले. आज हे डोम्लो नंबर जागतिक स्तरावर संशोधनाचे विविध टप्पे पूर्ण करत आहेत. यानंतर त्यांनी कापरेकर नंबर, ४९५- कापरेकर स्थिरांक, दत्तात्रय संख्या, हर्षद संख्या अशा संख्यांचा शोध लावला. केवळ निरीक्षणातून वेगवेगळे शोध कसे लावायचे, याचे उदाहरणच त्यांनी घालून दिले. याचा फायदा जगभरात विविध स्तरांवर होत आहे.

कापरेकर यांचा जन्म डहाणू-ठाणे (आत्ताचे पालघर) जिल्हा, येथे १७ जानेवारी १९०५ रोजी झाला. त्यांचे शिक्षण नाशिकमधील देवळाली येथे झाले. त्यांच्या महाविद्यालयीन काळात गणितातले रँग्लर परांजपे पारितोषिक मिळाले होते. ते नाशिकजवळच्या देवळाली येथे शिक्षक होते आणि १९६२ मध्ये निवृत्त झाले. नोकरीच्या काळात आणि निवृत्तीनंतरही कापरेकरांचा गणितातील आकड्यांशी खेळ चालूच होता. १९७५ साली अमेरिकेतील प्रा. मार्टिन गार्डिनर यांनी कापरेकरांच्या संशोधनाची दखल घेतली आणि त्यांच्या संशोधनावर आधारित मॅथेमॅटिकल गेम्स या सदराखाली सायन्टिफिक अमेरिकन या मासिकात लेख लिहिला आणि द.रा.कापरेकर भारतातच नाही तर जगभरात प्रसिध्द झाले. स्विडनच्या वर्ल्ड डिक्शनरी ऑफ मॅथेमॅटिक्स या ग्रंथात द.रा. कापरेकरांच्या नावाचा अंतर्भाव केला आहे. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते गणितासाठी आणि गणिताच्या प्रचारासाठी झटत राहिले. १९८६ मध्ये त्यांचे देवळाली (नाशिक) येथे निधन झाले.

❑❑❑





पौराणिक कथा

# वन प्रस्थान

लक्ष्मणाकडे वळून ठामपणे आदेश देत श्रीराम म्हणाले, लक्ष्मणा, उद्या तू सारथी सुमंतासह रथ सज्ज ठेव. तू स्वतः सीतेसह त्या रथात आरुढ हो व सीतेला राज्याच्या सीमेवर सोडून ये. गंगेच्या तटावर महात्मा वाल्मिकींचा आश्रम आहे. त्या आश्रमाजवळ निर्जन वनात सीतेला सोडून तू सत्वर परत ये. सुमित्रानंदन लक्ष्मण यावर काही बोलू पाहत होता, परंतु त्याला काहीएक बोलू न देता श्रीराम पुढे म्हणाले, "लक्ष्मणा, माझ्या या आज्ञेचं पालन कर. सीतेच्या संबंधात माझ्याशी कुठल्याही प्रकारचा वाद करण्याचा प्रयत्न करु नकोस. माझ्या निर्णयाविरुध्द तू काही बोलू नकोस. माझ्या या अभिष्टकार्यात जे बाधा आणतील, ते मला शत्रुवत ठरतील. तरी माझ्या आज्ञेचे पालन कर. सीता पूर्वी मला एकदा म्हणाली होती, की मी गंगातटावरील ऋषींचे आश्रम पाहू इच्छिते. म्हणून तिची ही इच्छादेखील पूर्ण करण्यात यावी." असे कठोरपणे बोलत असतानादेखील श्रीरामांचे डोळे पाणावले होतेच. हृदय भरुन आले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी दुःखद अंतःकरणाने व अतिशय कोरडेपणाने सुमंताला रथ जोडण्याची आज्ञा लक्ष्मणाने दिली. माता सीतेसाठी सुंदर

आसन रथात पसरविण्यात आले. सुसज्ज रथ घेऊन लक्ष्मण राजमहालात गेला व माता सीतेला म्हणाला, "देवी, तू श्रीरामांपाशी मुनींच्या आश्रमात जाण्याची इच्छा व्यक्त केली होतीस व महाराजांनीदेखील तुझी इच्छा पूर्ण करण्याची प्रतिज्ञा केली होती. त्याप्रमाणे राजाज्ञेने मी हा रथ गंगातटावरच्या ऋषींच्या सुंदर आश्रमापाशी घेऊन जाईन आणि तुला मुनिजनसेवित वनात पोहोचवीन." लक्ष्मणाचे उद्‌गार ऐकून आपले डोहाळे पुरवले जाणार म्हणून सीतेला मोठाच आनंद झाला. बहुमोल वस्त्रे, नाना प्रकारची रत्ने वैदेही सीतेने समवेत घेतली व ती वनयात्रेला निघाली. लक्ष्मणाला म्हणाली, "ही सारी बहुमोल वस्त्रे, आभूषणे व रत्ने मी मुनीपत्नींना देईन."

रघुनाथांच्या आज्ञेनुसार रथ त्वरेने वनाकडे निघाला. रथ वनाच्या दिशेने धावत असताना, माता सीता लक्ष्मणाला म्हणाली, "सुमित्रानंदन, का कुणास ठाऊक, परंतु मला खुपसे अपशकुन दृष्टीस पडत आहेत. हृदय अस्वस्थ झालं आहे, पृथ्वी शून्यवत भासत आहे." रथ गोमतीच्या तीरावर पोहोचला तेव्हा रात्र वाढत चालली होती. मग तिथल्याच एका आश्रमात त्यांनी एक रात्र मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी ते गंगेच्या तटावर पोहोचले. दुपारच्या वेळी भागीरथीच्या जलाशयापाशी पोहोचल्यावर लक्ष्मणाला आपले दुःख आवरले नाही. एकदम तळ्याचा बांध फुटावा तसा तो हमसाहमशी रडू लागला. लक्ष्मणाची ती शोकावस्था पाहून सीता चिंतीत होऊन त्याला म्हणाली, "लक्ष्मणा, तू का रडतो आहेस? गंगेच्या तटावर आल्यामुळे माझी चिरकालाची अभिलाषा पूर्ण झाली. अशा आनंदाच्या वेळी रडून तू मला दुःखी का करीत आहेस? श्रीरामांच्या दोन दिवसांच्या वियोगामुळे तुला एवढं दुःख झालं आहे काय! लक्ष्मणा, काहीही असलं तरी तू तुझं दुःख आवर. मला गंगेच्या पैलतीरावर घेऊन चल. तपस्वी मुनींचं दर्शन घडव. मी त्यांना वस्त्रंआभूषणं देईन, मग आपण पुन्हा अयोध्यापुरीला माघारी परत फिरु." मग सीतेसह लक्ष्मण नावेत बसला व गंगेच्या पैलतीरावर पोहोचला.

गंगेच्या पैलतीरावर उतरल्यानंतर लक्ष्मणाने सीतेला हात जोडले व म्हटले, "विदेहनंदिनी, माझ्या हृदयात एक मोठं शल्य आज बोचत आहे. वडीलबंधू श्रीरामांनी जे काम आज माझ्यावर सोपवले, त्यामुळे मी लोकनिंदेला पात्र ठरेन. असले कर्म करण्यापेक्षा मला मृत्यू पत्करणे अधिक सुलभ वाटले असते. देवी, त्यासाठी मला क्षमा कर." आणि हात जोडून दुःखावेगाने लक्ष्मण एकदम पृथ्वीवर कोसळला. लक्ष्मणाच्या या बोलण्याने व वर्तनाने मैथिली सीता एकदम संभ्रमात पडली. तिला काहीच बोध होईना तेव्हा ती म्हणाली, "लक्ष्मणा, हे काय? मला काहीच समजेनासं झालं आहे. सारं काही तू मला नीटपणे सांग." यावर लक्ष्मण अधिक दुःखी झाला.

❍ क्रमशः





कथा :

# यथा राजा तथा प्रजा

एकदा एका राजाच्या मनात आले, की यंदा शरदपौर्णिमेला (कोजागिरीला) नगरातील सर्व गोर-गरीब जनतेला पौष्टिक मसाला दूध प्यायला देऊन खूश करु. चांदण्या रात्री सर्वजण एकत्रित येऊन शरदोत्सव साजरा करु. ही कल्पना त्याने मंत्रिमंडळात मांडली. प्रधानासह सर्व मंत्र्यांनी या गोष्टीला आनंदाने मान्यता दिली. आणि त्याप्रमाणे दवंडी देण्यात आली, की ज्या शेतकऱ्यांकडे, प्रजाजनांकडे गाई-म्हशी असतील त्यांनी एकेक लोटा दूध पौर्णिमेच्या दिवशी पहाटे राजवाड्यातील मुदपाकखान्यात ठेवलेल्या भांड्यात आणून ओतावे. ठरल्याप्रमाणे

मुदपाकखान्यात मोठाली भांडी दुधासाठी झाकून ठेवण्यात आली. दूध ओतण्यासाठी झाकणावर नरसाळे ठेवण्यात आले होते. भल्या पहाटे प्रजाजनांची मुदपाकखान्यासमोर रांग लागली होती. प्रत्येक जण आत जाऊन लोटा रिकामा करुन आपली हजेरी लावत होता. सूर्योदय होईपर्यंत सर्वांनी येऊन आपली हजेरी लावली. त्यात प्रधानासह सर्व मंत्र्यांनीही आपली हजेरी लावली.

राजा आचाऱ्यांना दूध उकळून ठेवण्याचा आदेश देण्यासाठी मुदपाकखान्यात आला. त्याने किती दूध जमा झाले हे पाहण्यासाठी झाकण उघडले. राजाला मोठा धक्काच बसला. कारण ते भांडे पूर्णपणे पाण्याने भरलेले होते. राजाने प्रधानासह सर्व मंत्र्यांना बोलावलं आणि विचारलं, “तुम्ही सर्वांनी एकेक लोटा दूध आणून टाकलं ना ?” सर्वजण म्हणाले, “होय महाराज !” राजाने आचाऱ्याला झाकण बाजूला करायला सांगितले. पातेले दुधाऐवजी पाण्याने भरलेले पाहून सर्वांची बोबडी वळली. राजा म्हणाला, “प्रधानजी, तुम्हीच सर्व प्रजाजनांना आदेश दिला, मग तुम्ही स्वतः का नाही दूध ओतलं ?”

प्रधान थरथर कापत म्हणाला, “क्षमा असावी महाराज, मला वाटलं, सगळे दूध ओतणार, मग माझं एक लोटा पाणी त्यात सहज खपून जाईल.” राजाने मंत्र्यांकडे पाहिलं. मंत्री म्हणाले, “महाराज, आम्हालाही तसंच वाटलं.”

राजा सर्वांना दरडावत म्हणाला, “ज्या राज्याचे प्रधान आणि मंत्रीच भ्रष्ट आहेत त्या राज्यातील जनतेकडून प्रामाणिकपणाची अपेक्षा आपण कशी करणार ? तेव्हा स्वतःचं वर्तन आधी सुधारा. स्वतः चांगलं कर्म करुन दाखवा तेव्हाच जनता तुमचं अनुकरण करेल. तुमच्या पावलावर पाऊल ठेवले जाईल. जो स्वतः प्रामाणिक, निष्ठावान आणि निःस्वार्थ जीवन जगतो. त्याच्या शब्दात, वाणीत ती शक्ती असते जी सर्वसामान्यांच्या हृदयाला भिडते. म्हणूनच एक म्हण प्रचलित झाले, ‘यथा राजा तथा प्रजा’ सर्वांनी क्षमा मागत राजाला तसे वचन दिले.

राजानेही सर्वांना क्षमा करुन सुधारण्याची पुन्हा एक संधी दिली.

❑❑❑

## दिव्य वचन

जीवनाची सुंदरता देखील मनाच्या सुंदरतेवर अवलंबून असते. मन सुंदर असेल तर जीवनही सुंदर होऊन जाते. मनात ज्ञानाची ज्योत प्रकाशित झाली, की मन प्रकाशित होते. अंधकारातून प्रकाशात येण्याने मनात सुंदरता येते. सुंदरतेनेच इहलोक आणि परलोक सुंदर केला जाऊ शकतो. ज्ञानज्योत (मनात) प्रकाशित झाल्याने प्रेम, दया, करुणेचा भाव निर्माण होतो.


-बाबा हरदेवसिंहजी महाराज



# शब्दकोडे

# १७४

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )



## आडवे शब्द

१. प्रथम नोबेल पारितोषिक विजेती भारतीय महिला : मदर .......

३. कोणत्या राज्याची राजधानी दिसपुर आहे ?

५. अपयशाच्या विरुध्द शब्द

६. भारत रत्न पुरस्कार प्राप्त करणारा पहिला खेळाडू : ......... तेंडूलकर

१०. नेपाळ देशाची राजधानी

१२. अमेरिकेचे चलन

१३. दोनाचा चतुर्थघात अधिक तीनाचा वर्ग बरोबर किती ?

१५. महाभारतातील एक पात्र : जांबुवंत, बिभिषण, जरासंध, हनुमान

१६. समर्थ ........ स्वामी यांचा जन्म जांब येथे झाला.

## उभे शब्द

१. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म ....... जानेवारी, १८९७ रोजी झाला.

२. मुंबईतील मध्य रेल्वेचे एक स्थानक

४. नवऱ्याची आई

७. विदर्भाचे नंदनवन असे या ठिकाणाला म्हणतात.

८. मानव शरीराचा एक अंग

९. कारल्याची चव ......... असते.

११. पणजी शहर हे या नदीवर वसलेले आहे.

१३. संत निरंकारी मिशनचे वृत्तपत्र एक नजर हे दर ....... दिवसांनी प्रकाशित होते.

१४. ........ जानेवारी १९५० रोजी भारतात संविधान लागू झाले.

१५. संत नामदेवांची शिष्या : संत ........ बाई

उत्तरे इतरत्र



# दादाला विचारू या

प्रश्न : जीवनाचा उद्देश काय आहे ?

उत्तर : जीवन जगत असताना ते आनंददायी आणि सुखी व्हावे यासाठी जीवात्म्याला परमात्म्याशी जोडणे म्हणजेच ईश्वराची अनुभूती करणे, हाच खरा जीवनाचा उद्देश आहे.

प्रश्न : अहंकारी मनुष्य स्वतःला काय समजतो ?

उत्तर : सर्वोत्तम, समजदार आणि सर्वज्ञ समजत असतो.

प्रश्न : चांगल्या लोकांना ईश्वर लवकर बोलवून घेतो असे म्हणतात ते खरे आहे का ?

उत्तर : ईश्वराचं प्रत्येक कार्य हे सुनिश्चित असतं. मनुष्याचं जीवन हे त्याच्या श्वासावर अवलंबून आहे. श्वास पूर्ण झाल्यावर जीवाला देह सोडावाच लागतो. आपल्या अज्ञानामुळे आपल्याला तसे वाटते.

प्रश्न : विद्या ददाति विनयम् (विद्येने विनयशीलता येते) हे कितपत सत्य आहे ?

उत्तर : अगदी शंभर टक्के सत्य आहे. अर्धवट ज्ञानामुळे अहंकार निर्माण होतो. ते विनयशीलतेच्या विरुध्द आहे. पूर्ण ज्ञानाने आपल्या मर्यादा आणि विश्वाची विशालता समजते म्हणून विनयशीलता येते.

प्रश्न : ज्ञानदृष्टी आणि सांसारिक दृष्टी यात काय फरक आहे ?

उत्तर : ब्रह्मज्ञानाने ज्ञानदृष्टी प्राप्त होते. ज्ञानदृष्टीने पाहिल्यास लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, काळा-गोरा, स्पृश्य-अस्पृश्य असा भेद दिसत नसून सर्वांमध्ये ईश्वरी तत्त्वस्वरुप दिसून येते. हलके विचार, क्षुद्र भावना, मान-अपमान यास वाव नसतो. याउलट सांसारिक दृष्टीने पाहिल्यास सर्वत्र भेदभाव, विषमता आणि दोष दिसतात.

प्रश्न : आत्मज्ञान प्राप्त करणे खरेच आवश्यक आहे का ?

उत्तर : अर्थातच ! आत्मज्ञानाशिवाय मनुष्य जीवन हे पशूसारखे आहे. ईश्वराने मनुष्याला हा जन्मच मुळी ईश्वरप्राप्तीसाठी दिलेला आहे. ईश्वरप्राप्ती न केल्याने या जीवाला लक्ष चौऱ्यांशी जीव योनी भटकत अनेक जन्म घ्यावे लागतात.



# ब्रह्मज्ञानाने मानवीय संस्कार प्राप्त होतात

सत्संगाप्रती असणारी ओढ ही विशेष महत्त्वपूर्ण आहे. ज्याला सत्संगाची ओढ आहे तो कोणताही बहाणा करत नाही, तर सत्संगासाठी वेळ काढतोच काढतो. अन्य कामे मागे ठेवून सत्संगालाच प्रधान्य देतो. सत्संगाला प्राधान्य देऊन तिथे पोहोचण्याचा प्रयत्न करतो.

आज इथे जे पहिल्यांदाच सत्संगरुपात आले आहेत, त्यांना निवेदन करु इच्छिते की, निरंकारी मिशनमध्ये परमात्माच्या जाणकारीविषयी ज्ञान दिले जात आहे, परमात्मा अंगसंग आहे.

कपाट जर चावीने बंद केलेले असेल तर ते चावीशिवाय उघडले जाऊ शकत नाही. आपण कितीही जोर लावला तर चावीशिवाय ते उघडू शकत नाही. त्याचप्रमाणे आपण ज्ञानाच्या चावीनेच मानवीय संस्कारांचे द्वार उघडू शकतो. ज्ञान प्राप्त करुन त्या ज्ञानाचा उपयोगही करणे गरजेचे आहे. चांगले संस्कारच वास्तविकरुपाने मनुष्याला चांगल्या माणसांच्या श्रेणीत आणून ठेवतात.

परमात्म्याची जाणकारी अर्थात ब्रह्मज्ञान असं धन आहे की त्याचा जितका जास्त उपयोग केला जाईल तितके ते वाढत जाते.

आपण सर्वजण मर्यादापूर्वक सत्संगाचा आनंद प्राप्त करत आहात, शांत आणि आनंदित वातावरणामुळेच मनाला दिलासा प्राप्त होतो. सत्संगामुळे आपल्याला जीवनात सद्‌गुण धारण करण्याची शिकवण मिळते. कोणी बालक असो, युवक असो अथवा जेष्ठ असो शिकण्याच्या इच्छेने सत्संगामध्ये येतात. शिकण्याची ही भावना कायम टिकून राहायला हवी. जेव्हा मनुष्य त्या दृष्टिकोनाने सत्संगात येतो आणि प्रत्येक क्षणी निरंकाराची जाणीव ठेवतो तेव्हा एकत्वाचा भाव मजबूत होतो. निराकाराच्या जाणीवेतूनच आपण भक्तीपथावर अग्रेसर राहू शकतो.

निरंकार कृपा करो, प्रत्येक क्षणी धन्यवादाचा भाव कायम रहावा, प्रत्येकाची कामे पूर्ण व्हावीत आणि निरंकाराची प्रत्येकावर अशीच कृपा होत राहो.

❑❑❑

## ज्ञानाचा प्रकाश गरजेचा

चांगल्या गोष्टींचे कौतुक करणे चांगली गोष्ट आहे, पण चांगल्या गोष्टी स्वीकारणे त्याहूनही चांगले आहे. परोपकारी संत महात्मा चांगल्या गोष्टी आपल्या जीवनात अंगीकारतात आणि पूर्ण प्रयत्नही करतात की या चांगल्या गोष्टी जगातील सर्व लोकांपर्यंत पोचाव्यात, हा ज्ञानाचा प्रकाश ठिकठिकाणी पोचावा. महापुरुष ठिकठिकाणी या निराकार प्रभू परमात्म्याचा प्रकाश पोचवतात कारण ते जाणतात, की अंधारात केवळ ठोकरच मिळते आणि ज्या व्यक्तीला हा ज्ञानाचा प्रकाश मिळतो त्याच्या जीवनातून अंधकार नाहीसा होतो, त्याचे जीवन प्रकाशमय होते. अंधार अंधाराला मिटवू शकत नाही, प्रकाश अंधाराला मिटवू शकतो. जसे प्रकाशासाठी फक्त दिवा असणे पुरेसे नाही, तर तो प्रज्ज्वलीत करुन वास्तविक प्रकाश प्राप्त करायचा असतो. त्याचप्रकारे केवळ ज्ञानाचा उल्लेख करणे, ज्ञानाच्या गोष्टी करणे, ऐकणे, ऐकविणे एवढेच पुरेसे नाही, जोपर्यंत आपण हे ज्ञान स्वत: अंमलात आणत नाही, आपला कर्ताभाव सोडून सद्‌गुरुची शिकवण आत्मसात करत नाही, तोपर्यंत बाहेरचा अंधार भलेही आपण दिवा लावून नाहीसा करु; पण आतला अंधार संपणार नाही. आतील अंधार केवळ ज्ञानरुपी प्रकाशाने नाहीसा होऊ शकतो. एक तेवणारा दीपकच चौफेर प्रकाश करु शकतो, इतर अनेक दीपक प्रज्ज्वलीत करु शकतो.

**- माता सविंदर हरदेवसिंहजी**





कथा : विनोद अधिकारी

# जोतीची प्रतिज्ञा

त्या दिवशी जोतीला खूप आनंद झाला होता कारण त्याच्या मित्रानं त्याला आपल्या विवाहासाठी बोलावलं होतं. आपल्या मित्राच्या लग्नाला जायची जोतीची खूप इच्छा होती. पण आपला मित्र ब्राह्मण आहे. तो आपल्याला बोलावेल की नाही, याची जोतीला खात्री नव्हती. कारण जोती हलक्या जातीतला होता. जातीयतेच्या शापानं कलंकित झालेला तो काळ होता. उच्च-नीचतेचं ग्रहण साऱ्या समाजमनाला लागलेलं होतं! एखाद्या अस्पृश्याची सावली जरी अंगावर पडली


तरी विटाळ झाला म्हणून स्नान करणाऱ्या तथाकथित उच्च वर्णियांनी आपल्या घराच्या चार भिंतीत समतेच्या प्रकाशाला कोंडून ठेवलं होतं. तरीही जोतीला मित्राच्या लग्नाचं आमंत्रण मिळालं अन् जोती हरखून गेला. तो लग्नाला गेला. लग्न झालं, पण संध्याकाळच्या वरातीत मात्र अतिशय कटू अनुभव त्याला आला. वरातीत नवरदेवाच्या पाहुण्यारावळ्यांची प्रचंड गर्दी होती. उत्साहाच्या भरात जोती त्या गर्दीत मिसळला, भान हरपून घोड्यावरील नवरदेवाच्या अगदी जवळ जाऊ लागला. तेवढ्यात तापलेल्या शिसासारखे जळजळीत शब्द त्याच्या कानावर पडले.

"मूर्खा, आपली पायरी ओळखून चाल, दूर हो! शूद्र तो शूद्र, वर पुन्हा खुशाल आम्हाला विटाळ करतोयस! ब्राह्मणांच्या वरातीत मिरवायला लाज नाही वाटत!"

त्याचक्षणी जणू दारुगोळ्याच्या कोठारांवर ठिणगी पडली. जोतीने मशालीचे रुप धारण केलं. तो आंतर्बाह्य पेटून उठला. एक दिवस जातीयतेचं हे भूत मी गाडून टाकेन अन् समतेचं निशाण उंच फडकवेन अशी प्रतिज्ञा त्यानं मनोमन केली आणि ....... आणि आज आपण पाहत आहोत, की -

ज्या शाळांमध्ये त्या काळात अस्पृश्य विद्यार्थ्यांना त्यांचे गुरुजी छडी देखील फेकून मारत, त्याच शाळांमध्ये आता शेजारी बसणाऱ्या मुला-मुलींच्या मनात एकमेकांच्या जात, धर्म, वंशाबद्दल विचारसुध्दा येत नाहीत. हा चमत्कार घडविणाऱ्या त्या ज्योतीला म्हणजेच महात्मा ज्योतीबा फुले यांना शत शत वंदन!

❑❑❑



# सापडला नवा ग्रह


खगोलशास्त्रज्ञांनी एका नव्या 'सुपर-अर्थ' चा शोध लावला आहे. हा ग्रह सूर्यानजिकच्या एका ताऱ्याभोवती परिभ्रमण करत असून, पृथ्वीपासून सहा प्रकाशवर्षे दूर आहे. हा सुपर-अर्थ गोठलेल्या स्थितीतला असल्याने त्याच्यावर पाणी आणि जीवसृष्टी असण्याची शक्यता फारच कमी आहे; मात्र त्याच्यामुळे अंतराळातील अनेक गूढ गोष्टींची उकल होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नेचर या नियतकालिकात 'बर्नाड स्टार बी' नामक नव्या ग्रहासंबंधीचा शोधनिबंध प्रकाशित केला आहे. पृथ्वीपेक्षा ३.२ पट अधिक वजनाचा हा ग्रह २३३ दिवसात त्याच्या ताऱ्याभोवती परिभ्रमण करतो.

सौरमंडळाबाहेर पृथ्वीच्या जवळील हा दुसरा ग्रह असल्याचे लंडनच्या क्वीन मेरी विद्यापीठातील संशोधकांचे म्हणणे आहे. बनॉर्ड स्टार हा एक छोटा व थंड ग्रह आहे. त्याच्या उत्पत्तीचा काळ सूर्यापेक्षा दुप्पट जुना असल्याने तो कमी प्रकाशमान आहे.

❑❑❑






# आजोबा

चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा




जेव्हा तो मिठाईवाल्याच्या दुकानाजवळ गेला तेव्हा मिठाईचा मधुर वास त्याला आला. शेतकरी स्वत:ला सावरु शकला नाही. तो दुकानाजवळ जाऊन उभा राहिला. शेतकरी त्या मधुर सुवासाचा आनंद घेत थोडा वेळ तिथेच थांबला.
ज्यावेळी शेतकरी मिठाईचा सुगंध घेत होता. त्यावेळी मिठाईवाला त्याच्याजवळ गेला आणि त्याने शेतकऱ्याकडून पैसे मागितले.
चल, पैसे दे!
शेतकरी विचारात पडला आणि म्हणाला, मी तुमच्याकडून मिठाई घेतलीही नाही आणि खाल्लीही नाही. मग पैसे कसले?
शेतकऱ्याची ही गोष्ट ऐकून मिठाईवाला भांडण करु लागला.



अरे काय झालं तुम्ही दोघे का भांडत आहात ?
शेतकऱ्याने सर्व हकिकत कथन केली
मित्रा! तुला मी एक सल्ला देतो.
शेतकरी मिठाईवाल्याजवळ गेला. त्याने आपल्या खिशातून काही नाणी काढली आणि दोन्ही हातात घेऊन खण खण आवाज करु लागला.


शेतकरी जेव्हा आपल्या घरी जायला निघाला तेव्हा मिठाईवाला त्याच्या मागे जात त्याच्याकडे पैसे मागू लागला.
मिठाईच्या वासाचे पैसे द्या.
जर मिठाईचा वास घेऊन मिठाई खाल्ल्यासारखे होत असेल तर पैशांचा खणखणाट ऐकणं म्हणजे पैसे घेतल्यासारखेच आहे.
शेतकऱ्याचे हे उत्तर ऐकून सर्वजण खदखदा हसायला लागले. मिठाईवाला मान खाली घालून मागे फिरला.
एखाद्या प्रसंगाच्यावेळी थोडे धैर्य ठेवून विचार केला तर नक्कीच मार्ग मिळतो.



कथा


# दृढ भक्ती

भक्तीत भक्तांची अवस्था स्थिरचित असते. निर्गुणाच्या जाणिवेने अद्वैत-अविचल निर्गुण परमात्म्याशी त्याचे अनुसंधान होते. म्हणून भक्ताच्या जाणिवेची कदर करुन भक्तांसाठी संकटकाळी भगवंत धावून येतो. भक्तीत समर्पित असलेले असेच एक महाराष्ट्रातील थोर संत नामदेव महाराज यांच्या जीवनातील ही घटना आहे.

एका मंदिरात संत नामदेव महाराजांचे कीर्तन चालू होते. खुद्द बादशहाच्या कानावर त्यांची कीर्ती गेली. तेव्हा नामदेवांचे कीर्तन एक वेळ ऐकून त्यांच्या संतपदाची प्रचिती पाहण्याचा विचार बादशहाच्या मनात आला. नामदेवांचे कीर्तन चालू असताना

उर्वरीत पान क्र.२३ वर

# राष्ट्रीय प्रतिज्ञेचे जनक



पी.व्ही. सुब्बाराव

आपण शाळेमध्ये प्रार्थनेच्या वेळी पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञा रोज म्हणतो, 'भारत माझा देश आहे .....' या प्रतिज्ञेचे लेखक कोण याविषयी कुतूहल सर्वांनाच आहे. कारण 'जन-गण-मन' हे राष्ट्रगीत रवींद्रनाथ टागोरांनी लिहिले आहे, तर 'वंदे मातरम' हे राष्ट्रगान बंकिमचंद्र चटर्जी यांच्या नावाने ओळखले जाते. तशी ही प्रतिज्ञा लिहिणारे लेखक आहेत पी.व्ही. सुब्बाराव म्हणजे पेदेमरी व्यंकट सुब्बाराव.

राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेले, स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतलेले आंध्रप्रदेशातील नालगोंडा जिल्ह्यातील अन्नेपर्थी या गावचे तेलुगू कवी सुब्बाराव हे अनेक वर्षे जिल्हा कोषागार अधिकारी म्हणून सरकारी नोकरीत होते. आपल्या जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी म्हणावी म्हणून ही प्रतिज्ञा त्यांनी १९६२ मध्ये लिहिली. शिक्षण खात्यातील त्यांच्या मित्राने ती प्रतिज्ञा आंध्रप्रदेशच्या तत्कालीन शिक्षणमंत्र्यांना दाखवली. त्यांनी ती जिल्ह्यातील शाळा शाळांमध्ये घेण्याचा आदेश दिला. पुढे १२ ऑक्टोबर १९६४ ला बेंगळुरु येथे केंद्रिय शिक्षणमंत्री एम.सी. छागला यांनी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत राहण्यासाठी समितीच्या शिफारशीनुसार शाळा-महाविद्यालयांमध्ये देशपातळीवर स्वीकारण्याचा निर्णय घेतला आणि ही प्रतिज्ञा देशपातळीवर दि. २६ जानेवारी १९६५ पासून लागू झाली. या प्रतिज्ञेचा विविध भाषांमध्ये अनुवाद करुन सर्व राज्यांच्या पाठ्यपुस्तकामध्ये तिचा समावेश करण्यात आला. या प्रतिज्ञेला फक्त पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञेचा दर्जा न देता 'राष्ट्रीय प्रतिज्ञेचा' दर्जा देण्यात आला.

पी.व्ही. सुब्बाराव यांनी सुरुवातीला ही प्रतिज्ञा तेलुगू भाषेत लिहिली होती. १० जून १९१६ रोजी जन्मलेले हे कवी राष्ट्रप्रेमी कवी हा राष्ट्रीय वारसा ठेवून सन १९८८ मध्ये इहलोक सोडून गेले.

❒❒❒

# नेताजी सुभाषचंद्र बोस

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी,१८९७ रोजी ओरिसामधील कटक शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ आणि आईचे नाव प्रभावती होते. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील प्रख्यात वकील होते. प्रथम ते सरकारी वकील होते. पुढे त्यांनी वकिली हा स्वत:चा व्यवसाय सुरु केला. काही काळ त्यांनी कटक महापालिकेत काम केले होते. तसेच ते बंगाल विधानसभेचे सदस्यही होते. इंग्रज सरकारने त्यांना रायबहाद्दूर हा किताब दिला होता.

सुभाषचंद्रांचे प्राथमिक शिक्षण कटकमधील रॅवेन्शॉ कॉलिजिएट हायस्कूल मध्ये झाले. त्यावेळी त्यांना वेणीमाधवदास म्हणून शिक्षक होते. ते आपल्या विद्यार्थ्यांना देशभक्ती विषयीची प्रेरणा देत असत. वयाच्या १५ व्या वर्षी सुभाष गुरुच्या शोधात हिमालयात गेले. परंतु त्यांचा हा गुरुशोध असफल ठरला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून ते त्यांचे शिष्य बनले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन सुभाष भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत पास झाले. परंतु इंग्रज सरकारची नोकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले.

त्यानंतर त्यांनी कोलकात्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्याबरोबर काम केले. रवींद्रनाथ ठाकूर यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यावर प्रथम ते मुंबईला आले आणि म. गांधीजींची भेट घेतली. तो दिवस होता २० जुलै १९२१. ही त्यांची पहिलीच भेट होती. गांधीजींनी त्यांना कोलकात्यात जाऊन दासबाबूंच्या बरोबर काम



करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे ते कोलकात्यात गेले आणि दास बाबूंच्या बरोबर काम करु लागले.

१९२२ साली दासबाबूंनी स्वराज पक्षाची स्थापना करुन महापालिकेची निवडणूक लढवली व त्यात ते विजयी झाले आणि स्वत: कोलकात्याचे महापौर झाले व सुभाषबाबूंना मुख्य अधिकारी बनवले. त्यावेळी सुभाषबाबूंनी कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रजी नावे बदलून त्यांना भारतीय नावे दिली.

१९२८ साली कॉंग्रेसचे अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी खाकी गणवेश घालून पंडित मोतीलाल नेहरुंना सलाम केला आणि संपूर्ण इंग्रज सरकारजवळ संपूर्ण भारताच्या स्वराज्याची मागणी केली; परंतु ही मागणी इंग्रज सरकारने मान्य केली नाही.

१९३० साली लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन झाले. त्यात २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिवस म्हणून पाळला जाईल असे ठरले.

सुभाष बाबू ज्वलंत क्रांतिकारक असल्याचे

समजल्यावरुन इंग्रज सरकारने त्यांना मंडाले येथील तुरुंगात ठेवले. तुरुंगात त्यांची तब्येत बिघडली. ती इतकी की कदाचित त्यांचा मृत्यू कारागृहात होईल या भितीने इंग्रजांनी त्यांना सोडून दिले. १९३२ साली त्यांना पुन्हा अलमोडा येथील कारागृहात ठेवले. पुन्हा कारागृहात त्यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांना युरोपला पाठविण्यात आले. युरोपला येऊन देखील ते स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी क्रांतीवीर चळवळ चालूच ठेवली होती. तेथे त्यांना वीरुभाई पटेलांची साथ मिळाली.

१९३८ साली हिरापूर येथे काँग्रेसचे ५१ वे अधिवेशन होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष सुभाष बाबू होते. त्यावेळी सुभाष बाबूंचे स्वागत करण्यासाठी ५१ बैलांच्या रथातून त्यांची मिरवणूक काढली.

आपल्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत सुभाषबाबूंनी योजना आयोगाची स्थापना केली. त्या आयोगाचे पंडित जवाहरलाल नेहरु हे अध्यक्ष होते. बंगळुरु येथे वैज्ञानिक सर विश्वेश्वरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक विज्ञान परिषदही घेतली. १९३७ ला चीन जपानची लढाई झाली त्यावेळी सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखाली चिनी जनतेला सहाय्य करण्यासाठी डॉ. द्वारकानाथ कोटणीस ह्यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय पथक पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढे जेव्हा भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी जपानची मदत मागितली तेव्हा त्यांना जपानचे हस्तक व फॅसिस्ट म्हटले गेले. परंतु वरील घटनेवरुन हे सिध्द होते, की सुभाष बाबूना जपानचे हस्तक होते ना फॅसिस्ट विचारसरणीशी सहमत होते.

नेताजी सुभाषचंद्र बोस हे खरोखरच नावाप्रमाणे नेताजी होते. १८ ऑगस्ट १९४५ च्या दिवशी नेताजी सुभाषचंद्र बोस हे कसे व कुठे बेपत्ता झाले तसेच त्यांचे पुढे नक्की काय झाले हे कोणालाच कळू शकले नाही. त्यांच्यापुढील गूढ काहीही असो परंतु आज देशाला अशा राष्ट्रप्रेमींची आवश्यकता आहे आणि ती कायमस्वरुपी त्यांच्याबरोबरच लोप पावली असे म्हणावे लागत आहे. हे राष्ट्रप्रेमी स्वातंत्र्यवीरांनो, तुम्हाला कोटी कोटी प्रणाम!

❒❒❒

## दृढ भक्ती

पान क्र. २० वरुन

बादशहा तेथे आला आणि त्याने एक गाय आणवून तिचा तिथे वध करविला. नंतर त्याने नामदेव महाराजांना सांगितले, “जर ही मेलेली गाय जिवंत करुन उठवशील तरच तू खरा साधू, नाहीतर तुझा शिरच्छेद करीन. किती दिवसांत गाय जिवंत करशील?” असे नामदेवांना विचारल्यावर त्यांनी सांगितले, “चार दिवसांत उठवीन.” ते ऐकून बादशहा निघून गेला. हे संकट पाहून नामदेवांस फार चिंता वाटू लागली. त्याने पांडुरंगाचा धावा आरंभिला. तीन दिवस सारखे कीर्तन करुन “पांडुरंगा आता माझा अंत पाहू नकोस. लवकर धाव.” अशी प्रार्थना केली.

चौथ्या दिवशी देवाने नामदेवाच्या अंत:करणात प्रगट होऊन तात्काळ ती गाय उठवली आणि नामदेवास म्हटले, “सावध हो, डोळे उघडून पहा.” तेव्हा नामदेव म्हणाला, “देवा, चार दिवसापर्यंत तू माझा अंत का पाहिलास?” तेव्हा विठोबा म्हणाला, “नाम्या आत्ताच गाय उठवतो असे तू म्हणाला असता. तर मी त्याचवेळी येऊन ती गाय उठवली असती; परंतु तू चार दिवसांची मुदत घेतलीस म्हणून मला थांबणे भाग पडले. मी तुम्हा भक्तांच्या अधीन आहे. जसे तुम्ही बोलाल तसे मी त्याचवेळी केल्यावाचून राहणार नाही.” गाय जिवंत झाल्याची पाहताच बादशहाचा अहंकार गळून पडला आणि तो नामदेवास शरण गेला.

तात्पर्य : दृढ श्रध्दा आणि भक्ती असल्यास संकटकाळी परमेश्वर धावून येतोच. याविषयी थोडासुध्दा संशय मनी बाळगू नये.

❒❒❒

# पौष्टिक तत्त्वे आणि ऊर्जेने भरपूर बीट



☞ बीट मधुर, तुरट, शीतल व पचायला थोडे जड असते. यात फायबर्स, व्हिटॅमिन ए, बी, सी तसेच लोह, कॅल्शिअम, मँगनीझ, फॉस्फरस वगैरे खनिज तत्त्वे मुबलक प्रमाणात आढळून येतात. बीटाचे सॅलड व रसाच्या रुपात अथवा उकडून सेवन केले जाते. याचा रस पोषण, ऊर्जा, रोग-निवारण तसेच आरोग्य-संरक्षणाच्या दृष्टीने उत्तम आहे.

☞ बीट रक्त व रोगप्रतिरोधक शक्ती वाढविणारे आहे. हे हृदयाला मजबूत बनविते, यकृताला शक्ती देते आणि मेंदूला ताजेतवाने (फ्रेश) ठेवते. याचे फायबर्स जठर व आतड्यांची सफाई करतात. याच्या सेवनाने डोक्याची उष्णता व मानसिक कमजोरी दूर होते. बीट नैसर्गिक शर्करेचा चांगला स्त्रोत आहे.

☞ **रक्ताल्पता :** १-१ बीट व डाळिंब तसेच थोडी कोथिंबीर घेऊन यांचा रस काढून दिवसातून एकदा किंवा दोनदा घेतल्याने चमत्कारीक लाभ होतो.

☞ **मूळव्याध :** मूळव्याधीत जळजळ असेल तर ५० मि.ली. बिटाच्या रसात १ चमचा कोथिंबीरीचा रस मिसळून दिवसातून दोनदा प्यावे अथवा भोजनापूर्वी उकडलेले बीट कोथिंबीर टाकून खावे.

☞ **उच्च रक्तदाब :** उच्च रक्तदाबामुळे डोके जड वाटत असेल, उष्णता, अस्वस्थता वाटत असेल तर बीट व दुधीचा ५०-५० मि.ली. रस आणि १ चमचा मध मिसळून सकाळी रिकाम्या पोटी व सायंकाळी घेतल्याने लाभ होतो.

☞ **पचनक्रिया सुधारण्यात व पित्तजन्य रोगांमध्ये :** बिटाच्या एक कप रसात एक चमचा लिंबाचा रस मिसळून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते तसेच आम्लपित्त, उलटी, कावीळ इ. पित्तजन्य रोगांमध्ये लाभ होतो.


☞ **स्मरणशक्तीच्या विकासासाठी :** दिवसातून दोनदा बिटाचा रस प्यायल्याने स्मरणशक्तीचा विकास होतो.

☞ **दक्षता :** बीट पचायला जड असल्याने याचे अधिक सेवन करु नये. ज्यांची पचनशक्ती कमजोर असेल त्यांनी हे शिजवून खावे.

❑❑❑

# गुडघेदुखीत लाभदायी एकपाद
# उत्तानासन

अनेकांना सायटिकाचं दुखणं सतावत असतं. सायटिका (पायाच्या शिरेचं दुखणं), स्लिप डिस्क, गुडघेदुखी आणि कंबरेचं दुखणं या सर्व प्रकारच्या दुखण्यांमध्ये लाभदायक ठरु शकेल अशा आसनाची आज आपण माहिती घेणार आहोत. हे आसन करण्याआधी उताणं झोपायचं असतं. एक पाय वर उचलून त्याचा तळवा पुढे-मागे करायचा आहे. त्यामुळे पायामध्ये जो एक प्रकारचा ताण येतो. या ताणाचा परिणाम पाय आणि कंबरेचा खालचा भाग यावर पडतो, ज्यामुळे सायटिकावरीक तणाव नाहिसा होऊ लागतो. तसंच कंबरेवर आलेला ताणही कमी होतो. त्याबरोबरच हे आसन टाचेचं दुखणं, गुडघ्याचं दुखणं, व्हेरिकोज व्हेन्स आणि पायाच्या नसा एकावर एक चढल्यामुळे होणाऱ्या त्रासामध्येही लाभदायक ठरतं. यामुळे पायाचे सर्व स्नायू, नसा यांना ताकद मिळते. पाय जड होणं, पायांची दुर्बलता, किंवा सुन्न होणं हे दूर होऊन पायांना नवं बळ मिळतं. या आसनामुळे श्वसनाचे विकार, हर्निया यामध्ये फायदा होतो.




**कृती :** हे आसन करण्यासाठी उताणं झोपायचं आहे. हात जांघांच्या जवळ जमिनीवर ठेवा. आता हळूहळू उजवा पाय गुडघ्यातून वाकवून उभा करा. तशाचप्रकारे डाव्या पायालाही वाकवून घ्या. आता उजव्या पायावर थोडा दबाव टाकून आणि कंबर जमिनीवरच ठेवून श्वास घेत घेत डावा पाय जितका वर उचलता येईल तितका उचला आणि सरळ ठेवा. इथे उजव्या पायावर गुडघ्याजवळ डाव्या पायाचा गुडघा ठेवा. आता पायाचा तळवा हळूहळू पुढे-मागे करा. पुढे-मागे करताना थोडा वेळ खेचून ठेवा. हे करताना पायाच्या सगळ्या नसा खेचल्या जात असल्याचा अनुभव तुम्हाला येईल. ६ ते ८ वेळा पायाचा तळवा मागे-पुढे केल्यानंतर पाय गुडघ्यातून वाकवा.


# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


सांजवी धनावडे


स्पृहा देशमुख


गायत्री तायडे


निवेदिता राऊळ


अविष्का राजपूत


क्रितीका कानडे


अशीत सुर्यवंशी


अक्षरा आर्डड


अद्वैत रामाणे



रिधीमा दळवी


हर्षदा गोरे


आरोही पांचाळ


विधी थोरात


अविनाश आंधळे


राज ढेरे


वेदांत देसाई


वेदांत गोरे


आर्यन पाटील


आरोही कोळी


निमेश होळकर

स्वरूपा सुतार




सोहम शेणॉय


वेदश्री ठाकरे


हिदय पाटील

# सावित्रीबाई फुले

ज्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते; शिक्षणापासून आणि स्वातंत्र्यापासून दूर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि परतंत्र ठेवले जात होते. त्या काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. पुढे मात्र सावित्रीबाईंना, ज्योतिबा फुलेंच्या उदार दृष्टिकोनामुळे, स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडविण्याची संधी प्राप्त झाली.



महाराष्ट्रातील महान समाज सुधारक व दलितांचे उध्दारकर्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संघर्षमय समाजसुधारणाच्या कार्यात त्यांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री-शिक्षण दलित उध्दारक कार्य करणाऱ्या त्यांच्या सौभाग्यवती सावित्रीबाई फुले या सातारा जिल्ह्यातील शिरवळपासून जवळच असलेल्या नायगावच्या खंडोजी नेवसे पाटील यांच्या घरी ३ जानेवारी १८३१ रोजी जन्माला आल्या. त्यांची ही एकुलती एक लाडकी मुलगी होती. त्या काळात बालविवाहाची रुढ होती. त्यामुळे सावित्री सात वर्षाची होताच तिच्यासाठी नवरामुलगा शोधण्यासाठी मोहिम सुरु झाली. शिवाय सावित्री हाडापेराने मजबूत असल्याने सावित्रीबाईंच्या आई-वडिलांनी मोहीम जोरात सुरु केली. नेवसे पाटील आणि धनकवडीचे पाटील यांचा घरोबा होता. त्यातून ज्योतिबा बारा वर्षाचे आणि सावित्रीबाई नऊ वर्षाच्या असा विवाह झाला.

सावित्रीबाई आणि ज्योतिबा यांना अपत्य नव्हते. त्यांनी यशवंत नावाचा मुलगा आणि त्याच्या विधवा आईला आपल्या घरी सांभाळले. पुढे सावित्रीबाईंनी ज्योतीबांशी विचारविनिमय करुन यशवंतलाच दत्तक घेतले. यशवंतच्या खऱ्या आईला सावित्रीबाईंनी अत्यंत प्रेमाने वागविले ही त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष. सावित्रीबाईंना बालपणी घरच्यांकडून शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणे त्या काळात शक्यच नव्हते. सावित्रीबाईंना मात्र बालवयापासून शिकावे असे मनापासून वाटत होते.

१४ जानेवारी १८४८ साली ज्योतीबांनी पुण्यास मुलींची पहिली शाळा काढली. पण मुलींना शिकवायचे धाडस करायला कुणी शिक्षक पुढे येईना. तेव्हा सावित्रीबाई शाळेत जाऊन मुलींना शिकवू लागल्या. बायकांनी शिकणे हे महापाप आणि त्यांना शिकवणे हे तर महाभयंकर पाप, असे त्याकाळी सर्वच समाज समजत असल्याने सावित्रीबाई शाळेत मुलींना शिकवायला जाऊ लागल्या, की पुण्यातले अतिकर्मठ लोक त्यांच्यावर दगड, शेण, चिखल वगैरे फेकीत. पण सावित्रीबाईंनी या सर्व छळाला शांतपणे तोंड देऊन मुलींना शिक्षण देण्याचे कार्य चालू ठेवले. सावित्रीबाई आणि ज्योतीबा फुले यांनी नंतर दोन

उर्वरीत पान क्र.४४ वर

## वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : घाम आणि अश्रू यांच्या कार्यात नेमका फरक काय आहे ?**

**उत्तर :** घामात सामान्यत: प्रथिने नसतात. तथापि ज्यामुळे प्रथिने तयार होतात ती अमिनो आम्ले मात्र घामात असतात. घामात युरियाचे प्रमाण अश्रूंच्यापेक्षा दीड हजार पटीने जास्त आहे, पण घन पदार्थांचे प्रमाण अश्रूंच्या निम्मे आहे. सामान्यत: प्रतिव्यक्ती प्रतिदिनी सुमारे एक लिटर घाम गाळते, पण ते लक्षात येत नाही. घामाचे कार्य आहे त्वचेचे तापमान योग्य पातळीवर राखणे, तर अश्रूंचे कार्य डोळ्यांचे सतत संरक्षण करणे. अश्रूंमधील लायसोझाईम डोळ्यांवर येणाऱ्या जिवाणूंचा नाश करण्यासाठी उपयोगी असते. उन्हाळ्यात शरीराचे तापमान काही प्रमाणात वाढते. त्यावेळी जास्त घाम येऊन शरीराचे तापमान ३७ अंश सेल्सिअस एवढे राखले जाते. घाम आणि अश्रूंमार्फत शरीरात नको असलेले, जास्त झालेले पदार्थ बाहेर उत्सर्जित होतात. घाम आणि अश्रू यांच्या रासायनिक पृथ:करणात फरक आहे. पण दोन्हींमुळे उत्सर्जन क्रिया होत असते. सावज गिळल्यावर मगरीच्या, सुसरीच्या डोळ्यात अश्रू येतात. त्यानंतर त्यांच्या शरीरातील क्षारांचे प्रमाण खूप वाढते. ते अपायकारक असते. नक्राश्रू वाटे क्षारांचा निचरा होतो. कुत्र्याला घाम येत नाही. त्यांच्या जिभेवाटे घाम बाहेर पडतो.

**प्रश्न : कांगारु-कोआला सारखे प्राणी ऑस्ट्रेलिया आणि द.अमेरिका खंडातच का आढळतात ?**

**उत्तर :** कांगारु आणि कोआला या सस्तन प्राण्यांच्या पोटाजवळ पिशवी असते. या पिशवीत नुकतेच जन्माला आलेले पिलू मोठे होईपर्यंत राहते. कांगारुला एका वेळी एकच पिलू होते. जन्मत: ते खूप लहान असते. त्याची वाढ मातेच्या पोटाजवळील पिशवीतच होते. गवताळ प्रदेशात राहणारे कांगारु आणि झाडावर वस्ती करणारा कोआला हे निशाचर प्राणी आहेत. कोआला याचा ऑस्ट्रेलियातील आदिवासींच्या भाषेत 'पाणी न पिणारे' असा अर्थ होतो. कारण कोआलाला निलगिरीच्या पानातील पाणी पुरते.

गेली शंभर कोटी वर्षे दक्षिण अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया ही खंडे एखाद्या बेटासारखी इतर जगापासून वेगळी होती. अन्य भूभागापासून ऑस्ट्रेलिया जेव्हा विभक्त झाला तेव्हा त्या खंडावर राहणारे सस्तन प्राणी पोटाजवळ पिशवी असणारेच होते. उत्क्रांतीच्या ओघात त्यांच्यापासून इतर अनेक वेगवेगळे प्राणी तयार झाले.

एक कोटी वर्षांपूर्वी उत्तर अमेरिका खंडाला दक्षिण अमेरिका खंड जोडला गेला. त्यावेळी मात्र या प्राण्यांचा वेगवेगळ्या प्राण्यांशी संबंध आला. जगण्यासाठी त्यांना बराच संघर्ष करावा लागला. अनेक पिशवीधारक प्राणी निर्वंश झाले. ऑस्ट्रेलिया खंड म्हणजे एक विशाल बेट असून तेथे आजही प्रचंड संख्येने कांगारु आहेत. ऑस्ट्रेलियावर खरी मालकी कांगारुचीच आहे असे गमतीने म्हणायला हवे. कारण तेथील लोकसंख्या एक कोटी साठ लाख आहे आणि कांगारुंची संख्या एक कोटी ९० लाख आहे.

❑❑❑





# रिवा किल्ला

इ. स. १६७२ साली जंजिऱ्याच्या सिध्दीने मुंबईवर केलेल्या हल्ल्यानंतर इंग्रजांनी जे नवीन किल्ले बांधले त्यात सायनच्या टेकडीवर असणाऱ्या रिवा किल्ल्याचा समावेश होतो. हा किल्ला गिरीदुर्ग प्रकारात मोडतो. माहिमच्या खाडीमुळे मुंबई बेटे, मुख्य जमिनीपासून व साष्टी बेटांपासून वेगळी झाली होती. त्या काळात माहीमच्या खाडीतून व्यापार चालत असे. तसेच साष्टी बेट पोर्तुगिजांच्या ताब्यात होते. त्यामुळे माहिमच्या खाडीतून चालणाऱ्या व्यापारावर नजर ठेवण्यासाठी व उत्तरेकडून होणाऱ्या पोर्तुगिज व मराठ्यांच्या संभाव्य हल्ल्यांना तोंड देण्यासाठी इंग्रह जेरॉल्ड ऑगियरने इ.स. १६७२ मध्ये हा किल्ला बांधला.

## पाहण्याची ठिकाणे

रिवा किल्ल्याचा एकमेव अवशेष म्हणजे काळ्या पाषाणात उभा असलेला बुरुज.

## पोहोचण्याच्या वाटा

मध्य रेल्वेच्या सायन स्थानकावर उतरुन पूर्वेकडील डाव्या हाताच्या फुटपाथने चालत गेल्यावर २ मिनिटात आपण शासकिय आयुर्वेदिक महाविद्यालयाजवळ पोहोचतो. ह्या महाविद्यालयाच्या परिसरात टेकडीच्या उतारावर आयुर्वेदिक वनस्पतींची बाग केलेली आहे. ह्या बागेतच रिवा किल्ल्याचा साक्षीदार असलेला एकमेव बुरुज उभा आहे.

# भंडारा

मुख्यालय : भंडारा

क्षेत्रफळ : ३७५७ चौ. कि.मी.

तालुके : भंडारा, साकोली, तुमसर, मोहाडी, पवनी, लाखांदूर, लाखणी

नद्या : वैनगंगा ही प्रमुख नदी. याशिवाय बावनथडी, चुलबंद, मरु, सूर, बाघ, पांगोडी, गाढवी

खनिजे : मँगनीज

प्रमुख शेतकी उत्पादने : भात हे मुख्य पीक, गहू, ज्वारी, ऊस, बांबू

धरणे : चांदपूर हा मोठा तलाव. जिल्ह्यात अनेक तलाव असल्यामुळे तलावांचा जिल्हा असे या जिल्ह्याची ओळख आहे.

## विशेष माहिती -

भंडाऱ्याजवळ जवाहरनगर येथे युध्दसाहित्याचा मोठा कारखाना आहे.

१ मे, १९९९ रोजी म्हणजे महाराष्ट्र दिनी भंडारा जिल्ह्याचे विभाजन करण्यात येऊन गोंदिया हा नवीन जिल्हा निर्माण केला गेला.

भंडारा जिल्ह्यातील डोंगराळ व वनांखालील भागात गोंडांची वस्ती आहे.

तुमसर ही राज्यातील तांदळाची प्रमुख बाजारपेठ भंडारा जिल्ह्यात आहे.

❒❒❒





# प्रेम आणि मिलवर्तनाची सृष्टी वसवूया




संत महापुरुष आपल्या जीवनातून, आपल्या कर्मातून, आपल्या वेगवेगळ्या वेशभूषा, जाती-धर्म, बोलीभाषेच्या लोकांमध्ये एकत्वाचा भाव निर्माण करुन त्यांना एका माळेमध्ये ओवतात. संत इतरांच्या चुकांकडे दुर्लक्ष करता करता आपल्या चुका सुधारुन धरतीवर प्रेम आणि मिलनसारतेचे सुंदर विश्व स्थापित करतात. भक्त या निराकार प्रभुचा आधार घेऊन स्वतःही जोडून राहतात आणि इतरांनाही जोडण्याचे कार्य करतात. हाच एक मार्ग आहे वसुधैव कुटुंबकम च्या भावनेला पुनर्स्थापित करण्याचा, ज्याची आज जगाला फार आवश्यकता आहे. प्रेम-नम्रतेने जीवन जगण्याची आज गरज आहे, ती प्रत्येक मनुष्याने खान-पान, राहणीमान, रंग-रुप इ. च्या विविधतेला सहज रुपाने स्वीकार करत प्रेम, नम्रता आणि मिलनसारतेच्या भावनेचा स्वीकार करावा. अशाप्रकारे प्रत्येक मनुष्याचे जीवन सुंदर होईलच पण त्याचबरोबर जगाचं रुपही स्वर्गाप्रमाणे सुंदर होईल.

ही दुनिया चार दिवसांचा बाजार आहे, त्यानंतर या पाच तत्त्वांच्या पुतळ्याने मातीमध्ये मिसळून जायचे आहे. म्हणून हे माणसा! तू या मातीशी प्रतारणा करु नकोस, तूही माती आणि ही सुध्दा माती, तू जात-पात, श्रेष्ठ-कनिष्ठ या व्यर्थ गोष्टी करु नकोस. ही जात-पातही मातीच आहे. जर सर्व काही मातीमध्येच मिसळून जायचे असेल तर आपण एक दुसऱ्याबरोबर मिळून-मिसळून का राहू शकत नाही ? आपण का एक-दुसऱ्याचे वाईट चिंतन करतो ? आज माणूस याच प्रयत्नात असतो, की मी कोणत्या ना कोणत्या प्रकारे दुसऱ्याचे वाईट करु, भले मग त्याचे वाईट करता करता जरी माझे त्याच्यापेक्षा वाईट झाले तरी चालेल.

(- माता सविंदर हरदेवजी)



# हसा मुलांनो हसा



हौसाकाकू : मी रोज वजन चेक करत होते तेव्हा 68 भरत होतं आता चष्मा लावून पाहिलं तर 88 दिसलं.

ठमाकाकू : म्हणजे चष्म्याचं वजन २० किलो आहे तर!



राजा आणि गजा तीर्थयात्रेला निघाले होते. जेव्हा गंगा नदीच्या पुलावर गाडी आली तेव्हा लोक श्रध्देने सुटे पैसे नदीत टाकून नमस्कार करत होते. ते पाहून गजाने चेकबुक काढले. त्या चेकवर जय गंगा मैया असं लिहून तो चेक नदीत टाकला.

राजा : अरे, चेक नदीत का टाकला ?

गजा : अरे पंतप्रधान मोदी साहेबांनी सांगितलं ना, कॅशलेस व्यवहार करायचा म्हणून!



बाबा : (गण्याचा अभ्यास घेताना) गण्या, इथं लिहिलय - खुदी को कर बुलंद इतना, कि खुदा बंदे से पूछे, बता तेरी रजा क्या है ? याचा काय अर्थ होतो रे ?

गण्या : अहो बाबा, म्हणजे माणसानं एवढं काम करायचं, एवढं काम करायचं की शेवटी कंटाळून मालकाने म्हणावं - 'बाबारे तू रजेवर कधी जातोस ? बोल तुला किती रजा पाहिजेत ?'



कीर्तनकार : माणसाला सहा विकार नेहमी सतावत असतात. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर हे आहेत ते विकार.

तरुण : महाराज, सहा नाही आठ विकार माणसाला सतावतात.

कीर्तनकार : अरे बाळ, शास्त्र-पुराणात सहाच विकारांचा उल्लेख आहे.

तरुण : महाराज, आता दोन विकार वाढलेत - व्हॉटस ॲप आणि फेसबुक

गण्या सासरवाडीला गेला आणि खाली जमिनीवरच बसला.
सासुबाई : जावईबापू, अहो सोफ्यावर बसा.
गण्या : नको, सोफ्यावर गरीब माणसं बसतात.
सासुबाई : ते कसं काय ?
गण्या : आता मला सांगा. सोफ्याची किंमत किती ? १०-१५ हजार आणि जमिनीची किंमत किती ? एक लाख रुपये गुंठा ! मग सांगा सोफ्यावर बसणारा कोण ? ..... गरीब !

गण्या : (पालिस स्टेशनमध्ये) साहेब मला तक्रार नोंदवायची आहे. फोनवरुन सतत मला धमक्या येत आहेत.
पोलिस : कोण आहे तो, जो तुम्हाला धमक्या देत आहे ?
गण्या : साहेब, MSEB वाले म्हणतात, बिल भरलं नाही तर, कापून टाकीन.

छोटू : दादा, मासे खाल्ल्यावर तू पाणी का पित नाहीस ?
दादा : अरे, मासा जिवंत होऊन त्या पाण्यात पोहायला लागला तर.... ?

संता : ओये बेटा, ह्या दोन गाद्या कशाला अंथरल्या ?
बेटा : पापा, आज दोन पाहुणे येणार आहेत. एक मम्मीचा भाऊ आणि दुसरा माझा मामा.
संता : ओय पगले, एक गादी आणखी टाक. माझा साला पण येणार आहे.

गुरुजी : (इंग्रजीच्या तासाला) गणू Shall कधी वापरतात ?
गणू : थंडीत !

समर्थ दर्शन : भाग - ५१

# जयरामस्वामींवर संकट

एकदा समर्थ आणि केशवस्वामी यांची स्वारी मिरजेस असताना रात्री जयरामस्वामींचे कीर्तन झाले. विस्तीर्ण मंडप उभारुन समारंभ फारच छान आयोजित केला होता. समर्थही कीर्तनात बसले होते. कीर्तनात भक्तीभावाने गजर चालला होता. इतक्यात दिलेलखान या नावाचा ठाणेदार, गस्त घालण्यासाठी रात्री फिरत असताना हा कीर्तनाचा गजर ऐकून तेथे थोडासा उभा राहिला.

'साधू ज्या मार्गाने जातात त्या मार्गाने गेल्यास तात्काल रामाचे दर्शन होते.' हे वाक्य जयरामस्वामींच्या मुखातून निघालेले, दिलेलखानाच्या कानावर आले. तेवढेच वाक्य लक्षात ठेवून खान किल्ल्यामध्ये निघून गेला.

पहाटे समर्थ स्नानास निघून गेले व जयरामस्वामींचीही बाहेर जाण्याची तयारी झाली होती. इतक्यात दिलेलखानाकडून मनुष्य आला व त्याने विनंती केली, की खानसाहेबांनी आपल्यासाठी पालखी पाठविली आहे. तरी कृपा करुन किल्ल्यापर्यंत येऊन खानसाहेबांना दर्शन देऊन जावे.

खान हा बोलून चालून मुसलमान असताना त्याच्याकडून जयरामस्वामींना एवढ्या अगत्याचे बोलावणे आलेले पाहून सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटले. तथापि स्वामींचे मन जाण्यास धजेना. तरी शिष्यांनी आग्रह केला, की अशी संधी पुन्हा येणार नाही. खानासारख्या यवनाने जर एवढ्या इतमामाने बोलाविले आहे तर नाही म्हणून त्याचा अपमान करणे बरोबर दिसत नाही. याकरिता आपण जावे बरे.

जयरामस्वामी खानाने पाठविलेल्या पालखीत बसून किल्ल्यात गेले. स्वामी येताहेत हे ऐकून दिलेलखानही खूप आदराने सामोरा येऊन त्यांना किल्ल्यात घेऊन गेला. तेथे एक सिंहासन मांडले होते. जयरामस्वामीं पुढे स्वतः मोठ्या नम्रतेने हात जोडून उभा राहिला. ही त्याची कृती पाहून स्वामींना व इतर मंडळींना मोठे नवल वाटले. नंतर खानाने आपल्या यवनी भाषेत विनंती केली, साधू ज्या मार्गाने जातात त्या मार्गाने गेल्यास तात्काळ रामाचे दर्शन होते, तर मीही आपल्या मार्गानेच एवढा वेळ चालत आलो व पुढेही येण्यास तयार आहे. तरी काल रात्री आपण कीर्तनात सांगितल्याप्रमाणे राम दाखवावा.

हे त्यांचे बोलणे ऐकून स्वामीही स्तब्ध झाले. खानाने खूण करताच एका माणसाने मखमली कापड घातलेले एक सुंदर तबक स्वामींच्या पुढे



ठेवले. सर्वांच्या मनात आले की त्यात काही नजराणा असावा. परंतु उघडून पाहताच तो त्यात गोमांस ठेवलेले. त्याकडे बोट दाखवून खान म्हणाला, स्वामी आपण मला आताच्या आता राम दाखवा, नाहीतर मी आपणास आताच्या आता मुसलमान करीन.

ही ताकीद ऐकताच स्वामी तर अगदी भांबावून गेले आता पुढे काय करावे? ते सुचेनासे झाले. त्यांनी विचार करुन सांगितले, ह्याचे उत्तर रामदास म्हणून आमचे गुरु आहेत, ते आले म्हणजे देतील. मी शिष्य पाठवून त्यांना आणवितो. त्यांनी उत्तर न दिल्यास ते व आम्ही बरोबरच मुसलमान होऊ.

खानाने ती गोष्ट मान्य केली. तेव्हा जयरामस्वामींनी गोपाळ नावाच्या शिष्याला लगेच समर्थांकडे रवाना केले. समर्थ मार्कंडेश्वरी स्नान करीत होते. तेथे गोपाळ गोसावी गेले. त्यांना पाहून समर्थांनी प्रश्न केला, गोपाळा, का आलास? तेव्हा गोपाळ गोसावींनी जयरामस्वामींवर आलेला भयंकर प्रसंग सांगून रडायलाच सुरुवात केली.

समर्थ रागाने म्हणाले, मग आता माझ्याकडे कशाला आलास? असतील साधू तर त्यांनी द्यावे रामदर्शन करुन. जा मी येत नाही.

हे समर्थांचे क्रोधयुक्त बोलणं ऐकून गोपाळबुवा अतिशय घाबरले. आता जाऊन सांगावे तरी काय अशी त्यांची मोठी पंचाईत झाली. ते मोठ्या कष्टाने दीनवाणे तोंड करुन परत फिरले. पण गोपाळबुवा किल्ल्यात पोहचण्यापूर्वीच समर्थांची स्वारी यवनांच्या सभेत जाऊन उभी राहिली व जयरामस्वामींना हाक मारुन समर्थ म्हणाले, जयरामा, का बसलास, काय आहे?

समर्थांना पाहून जयरामस्वामींना धीर आला. त्यांनी सर्व वृत्तांत निवेदन केला. तो ऐकून समर्थ दिलेलखानाला म्हणाले, तुला मी राम दाखवितो, आमच्या मार्गाने तू येतोस काय?

खान छातीला हात लावून, येतो म्हणाला. तेव्हा समर्थ खानासह सर्व मंडळीना घेऊन फिरत फिरत निघाले व किल्ल्याच्या सभोवार फिरुन एका बुरुजावर आले. बुरुजास गंजीची लहान लहान भोके असतात, त्यातील एका भोकात शिरुन पटकन किल्ल्याच्या खाली जाऊन किल्ल्याच्या माचीवर उभे राहिले व जयरामस्वामींना म्हणाले, अरे तूही खाली ये.


❍ **क्रमशः**

---

भक्ताची पारख धन-दौलत किंवा श्रीमंतीने होत नाही. जर आपण विचार केला की, अमुक एक महापुरुष अनेक वर्षांपासून सत्संगात येतोय; त्याने ईश्वराचं ज्ञानही प्राप्त केलय म्हणजे आता तो लखपती किंवा करोडपती झाला असेल तर ही आपली भूल आहे. भक्ताची वास्तविक पारख त्याच्या भावनेवरुन होत असते. त्याचं जीवन एकरस असतं. दुसऱ्याचा तो कधीही अनादर करत नाही. कुणाचं मन दुखवत नाही. तो सदैव समाधानी असतो. ईश्वराच्या इच्छेत जगतो.

**- निरंकारी बाबाजी**

---



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा




मॅडम, लाकडाच्या चाकाचा शोध कधी लागला ?
लाकडी चाकाचा सर्वप्रथम शोध मेसोपोटामिया (पश्चिम आशिया) येथे लागला. इ.स. पूर्व ३५०० वर्षे अगोदर लाकडाचे तुकडे जोडून चाक बनविले जात असे.
मॅडम, मग याच्यात सुधारणा होऊन कसकशी प्रगती झाली. कृपया सांगा ना.
लाकडी चाकाचा विकास समयानुसार अनेक प्रकारे झाला.
हो, मॅडम!
प्राचीन काळी जास्त वजनदार वस्तू घेऊन जाण्यासाठी लाकडी रोलर बनविले जात असत व ते त्या वस्तूच्या खाली ठेवून त्यांच्यावरुन वस्तू सहज ढकलत घेऊन जात असत.


पण मॅडम, स्लेज तर बर्फाळ प्रदेशात चालते.
त्यावेळच्या लोकांनी वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी स्लेजचा शोध लावला.
मॅडम या चाकाचा शोध तर फार मजेदार आहे.
त्या स्लेजना रोलरवर बसून चालवण्याचा प्रयास केला गेला.
त्याच्यानंतर स्लेजच्या खाली रोलरचा उपयोग चाकाप्रमाणे होऊ लागला. त्यानंतर रोलरवर एक मोठी खाच पाडून त्यात स्लेज अडकवून स्लेजला अधिक दूर घेऊन जाणे सोपे झाले.


अशाप्रकारे रोलरला चाकाचा आकार दिला गेला.
त्यानंतर लाकडी चाक लावून सर्वात प्रथम लाकडी गाडी तयार झाली.
इ.स.२००० पूर्व ही चाकं रथ आणि बैलगाड्यांना लावली गेली. त्यानंतर ह्या चाकांमध्ये विकास होत गेला. त्याचा परिणाम आज आपण पाहतच आहोत.
हो मॅडम! ट्रक, बसेस आणि रेल्वेगाडी देखील चाकावरुनच चालतात.
पाहिलंत मुलांनो! या चाकाचा शोध आज आपल्या किती कामाला येत आहे.
हो मॅडम!
मुलांनो! मानवाच्या विकासामध्ये चाकांचे फार महत्त्व आहे.



## लढवय्यी

# नजूबाई गावित

भारतीय साहित्यविश्वात अतिशय सशक्त आणि प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणून नजूबाई गावित यांचे नाव घ्यावे लागेल. आदिवासींचे सर्वकष भावविश्व जसे त्यांनी आपल्या साहित्यातून साकारले, तसेच केवळ आदिवासी स्त्रियांसाठी नाही, तर समग्र वंचित, शोषित, उपेक्षित, पीडित, कष्टकरी महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी एक धडाडीच्या कार्यकर्त्या म्हणून त्या चळवळींमध्ये अग्रेसर राहिल्या. आजही सातत्याने त्या हे कार्य करताना दिसतात. लढवय्या कार्यकर्त्या म्हणून आजही नजूबाईंकडे वंचित, उपेक्षित समाज मोठ्या आदराने आणि अभिमानाने बघतो.

नजूबाईंचा जन्म १० जानेवारी १९५० रोजी बोढरीपाडा, ता. साक्री, जि. धुळे (आताचा नंदुरबार जिल्हा) येथे एका भूमिहीन मावची आदिवासी कुटुंबात झाला. दळणवळणाची साधने, रस्ते, वीज, शिक्षण अशा भौतिक सुविधांपासून कोसो दूर असलेल्या या आदिवासी दुर्गम पाड्यात अतिशय दारिद्र्यमय, कष्टमय, एकत्र व मोठ्या कुटुंबात नजूबाई लहानाच्या मोठ्या झाल्या. अशा सगळ्या प्रतिकूल परिस्थितीत त्यांना चौथीपर्यंत शिक्षण घेता आले. लग्नानंतर पती, मुले याकडे लक्ष्य पुरवितानाच दारिद्र्यमय परिस्थितीशी संघर्ष हे जणू त्यांच्या पाचवीलाच पूजलेले असल्यामुळे कष्टमय जीवन त्यांच्या वाट्याला आले. कॉ. शरद पाटील यांच्या संपर्कात आल्यानंतर मात्र नजूबाईंच्या जीवनात अमूलाग्र परिवर्तन घडले. मूलतः नजूबाईंचा स्वभाव अन्यायाविरुध्द पेटून उठण्याचा असल्याने कॉ. शरद पाटील यांच्या साथीने त्यांना नवीन ऊर्जा मिळाली. देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे उलटूनही आदिवासी समाजापर्यंत विकासाची संकल्पना पोहोचली नाही. ते अशिक्षित, भोळे असल्यामुळे समाजातील सर्वच घटक त्यांचे शोषण करतात. या विचारांनी अस्वस्थ झालेल्या नजूबाईंना समाजातील उपेक्षित, वंचित, शोषित समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द लढण्यासाठी एक दिशा मिळाली.



कविता : सुरेश तिर्लोटकर

# जय हिंद

भारतमाता अमुच्यासाठी आहे जगी महान
रणांगणी या मातेसाठी, शहीद झाले जवान
तहान भूक विसरुनी लढले, स्वातंत्र्य सेनानी
राखण्या मान तयांचा, सज्ज असा सर्वांनी
वंदे मातरम् च्या घोषाने, भारत दुमदुमले
शूर वीर कित्येक असे फासावर चढले
जयहिंद जयकाराने, दुमदुमला भारत देश
यशवंत जाहले क्रांतीकारक, सरला सारा क्लेष
प्रिय आम्हाला अमुचा भारत, साऱ्या जगताहुनी
शान टिकविण्या सज्ज राहुया आपण सर्वांनी





कथा

# बुद्धांचा उपदेश

एकदा भगवान गौतम बुद्ध आपल्या शिष्यांसह भ्रमण करत करत एका गावात पोहचले. गावातील लोकांना कळले, की भगवान बुद्ध आपलं दु:ख दूर करतात. त्यामुळे लोक त्यांच्या दर्शनाला येऊ लागले.

काही वेळाने एक धनाढ्य गृहस्थ त्यांच्या दर्शनाला आला आणि आपलं दु:ख त्यांच्यासमोर कथन करत म्हणाला, "भगवन्! माझं जीवन अपार दु:खानं भरलेलं आहे. माझ्या जीवनात दु:खच दु:ख आहे." भगवन म्हणाले, "बोल

वत्सा! काय झालं एवढं दु:खी व्हायला?" तो गृहस्थ म्हणाला, "काय सांगू महात्मन्! चार वर्षापूर्वी माझी पत्नी वारली. त्यानंतर दोन वर्षापूर्वी आजाराचं निमित्त होऊन माझा पाच वर्षाचा मुलगाही मला सोडून गेला. गेल्या वर्षी व्यापारात मला खूप नुकसान सहन करावं लागलं....." आपली करुण कहाणी सांगून झाल्यावर तो म्हणाला, "सांगा, आता मी काय करावं?"

भगवान बुद्धांनी त्याची व्यथा शांतपणे ऐकून घेतली. नंतर त्यांनी आपला शिष्य आनंद याला एक पेला पाणी आणि मीठ आणायला सांगितलं. बुद्धांनी मूठभर मीठ पेल्यात मिसळलं आणि ते पाणी त्या गृहस्थाला प्यायला सांगितलं. ते खारट पाणी तोंडात घेतल्याबरोबर त्यानं ते थुंकून टाकलं. तो म्हणाला, "भगवन्, पाणी खूपच खारट आहे. एक घोटही गिळवणार नाही." त्यावर बुद्ध हसले, म्हणाले, "ठीक आहे. चल माझ्याबरोबर."

भगवान बुद्ध त्याला घेऊन एका झऱ्याच्या काठी गेले. दोघेही खाली बसले. बुद्धांनी मूठभर मीठ झऱ्याच्या पाण्यात टाकलं, पाणी हातानं ढवळलं आणि म्हणाले, "आता हे पाणी पी." तो गृहस्थ ओंजळीत पाणी घेऊन प्यायला. भगवन् म्हणाले, "कसं आहे पाणी?" "पाणी तर गोड आहे. खारटपणाचा लवलेशही नाही."

बुद्ध म्हणाले, "मित्रा, दु:ख हे मिठासारखं आहे आणि जीवन हे पाण्यासारखं आहे. आपण आपलं जीवन संकुचितपणाने जेव्हा जगू लागतो तेव्हा दु:खाची तीव्रता वाढू लागते. जसं, पेल्यातील पाणी मर्यादित स्वरुपात असल्याने खारटपणा जास्त जाणवला. तेच झऱ्याच्या पाण्यात विरघळलेल्या मिठाचा खारटपणा कुठल्या कुठे निघून गेला. तो जाणवलादेखील नाही. तसंच माणसाचंही आहे. त्याने जर आपलं जीवन वाहत्या झऱ्यासारखं बनवलं तर तो स्वत:ही निर्मळ राहील आणि इतरांनाही आनंदच देईल.

म्हणून बंधो, दु:ख कवटाळत न बसता ज्यात आनंद आहे त्यात रममाण हो. मन संकुचित न करता विशाल बनव. प्रत्येक जीवमात्राशी मैत्री कर. त्यांच्या सुख-दु:खात सहभागी हो. इथं जन्मलेला प्रत्येक जीव देह त्यागून सारं काही इथंच ठेवून एकटाच जाणार आहे. ह्या सत्याचा स्वीकार कर."

भगवान बुद्धांच्या उपदेशाने त्या गृहस्थाच्या मनाची तगमग शांत झाली. अतिशय प्रसन्न मनाने तो त्यांना नतमस्तक होत धन्यवाद देऊ लागला.

खरंच 'जगी सर्व सुखी असा कोण आहे। विचारी मना सर्व शोधूनि पाहे।।' ही समर्थांची उक्ती किती सार्थ आहे. बुद्धांनी सांगितलेला विशालतेचा मार्ग अनुसरु या आणि जीवन सुखमय करु या.

❑❑❑

क्रोध एकटा येतो; पण चांगुलपणा घेऊन जातो. संयम देखील एकटाच येतो; पण चांगुलपणा देऊन जातो.

---

कासवाच्या गतीने का होईना पण रोज थोडी थोडी प्रगती करावी. खूप ससे येतील आडवे; पण त्यांना हरवायची हिंमत ठेवा.



विशेष

# लोकर देणारा अंगोरा ससा

स्वेटर, शाल, कानटोप्या बनविण्यासाठी मेंढ्याच्या लोकरीचा उपयोग केला जातो. लोकर हिमालयीन मेंढरांची असेल, तर एक नंबरची समजली जाते. महाराष्ट्रातील मेंढरांची लोकर घोंगड्या बनविण्यासाठी वापरतात.

सर्वात मऊ व चमकदार लोकर अंगोरा नामक सशाची असते. यासाठी हे ससे पाळले जातात. अंगोराच्या लोकरीपासून बनविलेले स्वेटर उच्च प्रतीचे व महाग असतात. अंगोरा ससे युरोपातील काही देशांत आढळतात. हल्ली हे ससे आयात करुन हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मिर येथे पाळले जात आहेत व तेथील हवामान सशाला चांगली मानवते, असे दिसून आले आहे. अंगोरा ससे पालन हा एक छोटा पण हमखास पैसा मिळवून देणारा लघुद्योग बनला आहे.

या सशांपासून लांब, कोमल व पांढरी लोकर मिळते. लोकर हाताने व मशीनने कापली जाते व प्रतनुसार वेगळी केली जाते. थंडीच्या दिवसात लोकर भरपूर मिळते. त्यामुळे बाजार पेठेत याचा लिलाव होत असतो. लोकर कापल्यानंतर सशांना १० ते २५ डिग्री सेल्सिअस तापमानात ठेवावे लागते.

उत्तर भारतातील पिथिरागड, अलमोडा व नैनिताल येथे अंगोरा पालन संस्था असून, तेथे हे ससे लोकरीसाठी व प्रजननासाठी विकले जातात. हा नवा कुटिरोद्योग आता भरभराटीला येऊ लागला आहे.

❒❒❒

## सावित्रीबाई फुले

पान क्र. २७ वरुन

शाळा काढल्या. त्या व्यवस्थित चालल्या. पुणे येथील हे शिक्षण कार्य पाहून १८५२ मध्ये इंग्रज सरकारने फुले पतीपत्नीचा मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला आणि शाळांना सरकारी अनुदानही जाहीर केले. भारतातल्या मुलींच्या पहिल्या शाळेतील या पहिल्या शिक्षिकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालूच ठेवले.

सावित्रीबाईंनी ज्योतीबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला. स्त्रियांनी शिकावे हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. अनाथांना आश्रय मिळावा ही त्यांची कार्यक्षेत्रे त्यांच्या श्रध्देने प्रभावी झाली. सामाजिक कार्यात पुढाकार घेणे हे त्यांचे ध्येय होते. त्यामुळेच १८७६-७७ मधल्या दुष्काळात त्यांनी खूप कष्ट केले. पुढे १८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आली असताना त्यांनी आपल्या स्वत:च्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वत:च प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या आणि १० मार्च १८९७ मध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. समाजातल्या दीन दलितांना मायेने जवळ करणाऱ्या स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून धडपडणाऱ्या सावित्रीबाई खऱ्या अर्थाने ज्योतीबांच्या सहचारिणी म्हणून शोभल्या. त्यांच्या थोर सामाजिक कार्याविषयाची कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन 'बालिका दिन' म्हणून साजरा केला जातो.

❒❒❒



कविता : एम. के. मजगे

# संत समागम

संत समागम
एक सुवर्णसंधी
जन्मोजन्मीची आत्म्याची
भूक मिटविण्याची
मिटवून स्वतःचे अस्तित्व
विराट अस्तित्वात मिसळण्याचे
लखलखणाऱ्या ताऱ्याप्रती
तेवणाऱ्या अव्याहत दीपागत
ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीतून
अमरपदाला पोचविणारा
एक यशस्वी मार्ग
संत समागम

**महाराष्ट्राचा ५२ वा प्रादेशिक वार्षिक संत समागम दिनांक २५, २६, २७ जानेवारी २०१९ रोजी सिडको मैदान, सेक्टर २८-२९, सेंट्रल पार्क समोर, खारघर, नवी मुंबई - ता. पनवेल, जि. रायगड**



# सामान्य ज्ञान



१) सावित्रीबाई फुले यांचा जन्म कोणता दिवस म्हणून साजरा करतात ?

अ) शिक्षक दिन ब) समता दिन क) महिला दिन ड) बालिका दिन

२) छत्रपती संभाजी राजांचा राज्याभिषेक १६८१ साली कोणत्या तारखेला झाला ?

अ) १६ जानेवारी ब) २६ जानेवारी क) ६ जानेवारी ड) १ जानेवारी

३) अलीकडेच इस्त्रो या संस्थेने किती उपग्रहांचे प्रक्षेपण एकाच वेळी केले ?

अ) ३० ब) ३१ क) ३५ ड)३६

४) पाठ्यपुस्तकातील राष्ट्रीय प्रतिज्ञा कोणी लिहिलेली आहे ?

अ) साने गुरुजी ब) रवींद्रनाथ टागोर क) पी.व्ही. सुब्बाराव ड) डॉ. राधाकृष्णन

५) सूर्यमंडळाचा शोध कोणी लावला ?

अ) ॲरिस्टॉटल ब) कोपर्निकस क) जोसेफ प्रिस्टले ड) न्यूटन

६) सहा वेळा सुवर्णपदक जिंकणारी जगातील पहिली महिला बॉक्सर कोण ?

अ) कर्णम मल्लेश्वरी ब) साक्षी मलिक क) पी.व्ही. सिंधू ड) मेरी कोम

७) पंजाब केसरी असे कोणाला म्हटले आहे ?

अ) लाला लजपतराय ब) दारासिंग क) ग्यानी झैलसिंग ड) मनमोहन सिंग

८) तिरंगी ध्वजाचा कोणता रंग पावित्र्याचे प्रतीक आहे ?

अ) निळा ब) हिरवा क) पांढरा ड) केशरी

९) रामायणात वर्णन केलेले पुष्पक विमान कोणाच्या मालकीचे होते ?

अ) कुबेर ब) रावण क) श्रीराम ड) बिभीषण

१०) आध्यात्मिक विकासाबरोबरच विविध खेळातून तरुणांची जडण घडण होण्यासाठी वर्तमान सद्गुरुने कोणता उपक्रम सुरु केला आहे ?

अ) NYH ब) NIS क) NSS ड) NYS

उत्तरे इतरत्र





# शिकारीत तरबेज स्पायडर हंटर

इंग्रजीमध्ये स्पायडर हंटर या नावाने ओळखला जाणारा हा पक्षी. याला मराठी छोटा कोळीखाऊ या विचित्र नावाने ओळखलं जातं. भारतात सर्वत्र आढळणारा हा पक्षी फिलिपिन्स, श्रीलंका, म्यानमार या देशांमध्येही आढळतो. भारतात विशेषतः हिमालयातील झाडीत आणि जावा व सुमात्रा या बेटांवर आढळतो. हा पक्षी आता दुर्मिळ होत चालल्याने याचं क्वचितच दर्शन होतं.

हा सूर्यपक्ष्याच्या जातीतीलच एक पक्षी असून, हा काळ्या-पिवळसर रंगाचा असतो. हा पक्षी १३-२२ सेंटीमीटर लांबीचा व फक्त ४९-५० ग्रॅम इतक्या वजनाचा असतो. हा चिमुकला पक्षी त्याच्या बाकदार चोचीमुळे अगदी गोंडस व सुंदर दिसतो. त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा लांब, बाकदार व टोकाकडे निमुळत्या होत जाणाऱ्या टोकेरी चोचीमुळे त्याला अन्न मिळवणं सोपं जातं. कोळी व बारीक कीटक पकडून खाण्यात हा तरबेज असतो. कोळ्याच्या जाळ्यामधून त्याला टिपून खाणं व फुलाच्या आत चोच घालून मध शोषूण घेणं याला सहज जमतं. फळबागा असणाऱ्या क्षेत्रात हा हमखास आढळतो. विशेषतः केळीच्या झाडावर याचं वास्तव्य दिसून येतं.

वेगवेगळी फळं, फुलांमधला मध, छोटे कीटक, किडे हे याचं मुख्य खाद्य आहे. घनदाट जंगलं, गवताळ प्रदेश, बांबूचं वन व दाट झाडीझुडपांत हा विशेषत्वाने आढळतो. हा पक्षी पाच ते सहा जणांच्या थव्यात आढळतो. तसंच आयुष्यभर एकाच जोडीदाराबरोबर राहणं पसंत करतो.

या पक्ष्याचं घरटं घनदाट झाडीत असतं. विणीच्या हंगामात हिरवी पानं, मऊ गवत व काड्या वापरुन मादी एकटीच घरटं तयार करते. या काळात मादी एका वेळी दोन ते तीन अंडी घालते. ही अंडी नर व मादी दोघं मिळून उबवतात व दोघं मिळून पिल्लांचं संगोपन करतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव





कथा : अनुप साळगांवकर (दादर)

# प्रयत्नांती परमेश्वर

एका हिरव्यागार रानात, एका टुमदार झाडावर एका चिऊताईने बारीक काटेकुटे, सुके गवत, कापूस, पिसे गोळा करुन एक छानसं घर बांधलं होतं. ती आणि तिची दोन पिल्लं त्या घरट्यात खूप आनंदाने राहत होती. दिवसामागून दिवस सरत होते. पिल्ले हळूहळू मोठी होत होती. चिऊताई आपल्या पिल्लांना स्वसंरक्षण आणि स्वावलंबनाचे धडे देत होती. ती गोजिरवाणी पिल्लंही आपल्या आईचे अनुकरण करत होती. एक दिवस पहाटे चिऊ आपल्या पिल्लांसोबत अन्न

शोधण्यासाठी घरट्याबाहेर पडते. सायंकाळी घरी येऊन पाहते तर अचानक साऱ्या जंगलभर वणवा पसरलेला असतो. आगीचे नुसते डोंब उसळलेले असतात. चिऊताईच्या राहत्या झाडाची आणि घरट्याची राखरांगोळी झालेली असते. पिल्लं हे सारं निसर्गाचं रुद्ररुप पाहून खूप घाबरुन जातात आणि चिऊकडे केविलवाण्या नजरेने पाहू लागतात. चिऊ आपल्या पिल्लांना स्वावलंबी बनवण्याची ही खूप छान संधी आहे असा विचार करते आणि काहीही न बोलता पिल्लांसोबत दुसऱ्या एका जवळपासच्या रानात निघून जाते. तिकडे एका उंच, डेरेदार झाडाची आपल्या घरट्यासाठी निवड करते. इतरत्र भटकून काटेकुटे, सुके गवत, कापूस, पिसे शोधण्याचा प्रयत्न करते. तिच्या पाठोपाठ पिल्लंही नवे घरटं बनवण्याच्या तयारीला लागतात. बघता-बघता एक छानसं घरटं आकाराला येतं. चिऊताईला घरटं बांधणीच्या कामात आपल्या पिल्लांनी केलेल्या मदतीचे फार कौतुक वाटते आणि पिल्लांच्या चिवचिवाटात जाणवतो तो स्वनिर्मितीचा आनंद.

म्हणून दोस्तहो, कितीही कठीण परिस्थिती असेल तरी घाबरुन जाऊ नये. धैर्याने संकटाचा सामना करावा. परिस्थिती आपल्या हातात नसली तरी प्रयत्न करणं आपल्या हातात आहे हे कधीही विसरु नये.

□□□

# निरंकारी पत्र-पत्रिकेचे नवीन सदस्य दर



सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या असीम कृपाशीर्वादाने निरंकारी पत्र-पत्रिका अनेक प्रांतांच्या विभिन्न भाषांमध्ये छापली जात आहे. आतापर्यंत यांच्या सदस्यतेची वर्गणी एक वर्षासाठी १५०/- आणि ५ वर्षासाठी ७००/- होती. सद्गुरु माताजींनी वाचकांच्या सुविधेवर ध्यान देत सध्याच्या वर्गणीबरोबर ३ वर्ष आणि ११ वर्षाच्या सदस्यतेची सुविधा उपलब्ध केली आहे. याचे विवरण पुढील प्रमाणे आहे -

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाल | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कनाडा/आस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

आपण या सुविधांचा भरपूर लाभ घ्यायचा आहे आणि पत्रिकेच्या उत्तरोत्तर कार्यासाठी अन्य सज्जनांनाही प्रेरणा द्यायची आहे.

५२ व्या संत निरंकारी समागमाचे औचित्य साधून जेव्हा आपले मुंबईला आगमन होईल तेव्हा आपली पत्र-पत्रिकेची वर्गणी जरुर भरावी, तसेच काही अडचण निर्माण झाल्यास संत समागम मैदानातील पत्रिका कार्यालयामधील संगणकावर आपला योग्य पत्ता, पिन कोड, मोबाईल नंबर चेक करावा/नमुद करुन द्यावा. ज्यानुसार मंडळातील रेकॉर्ड/लेखी नोंद अपडेट केली जाऊ शकेल. दूर देशातील पत्रिका सदस्यांनी आपला मोबाईल नंबर/ई-मेल अवश्य लिहून द्यावा.

-सी.एल.गुलाटी, प्रभारी, पत्रिका-प्रकाशन
संत निरंकारी मंडळ, दिल्ली - ११०००९

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ड
२) अ
३) ब
४) क
५) ब
६) ड
७) अ
८) क
९) अ
१०) ड

## शब्दकोडे १७४

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ ते | रे | २ सा | ■ | ३ आ | ४ सा | म |
| वी | ■ | ५ य | श | ■ | सू | ■ |
| ६ स | ७ चि | न | ■ | ८ ओ | ■ | ९ क |
| ■ | ख | ■ | १० का | ठ | ११ मां | डू |
| १२ डॉ | ल | र | ■ | ■ | ड | ■ |
| ■ | द | ■ | १३ पं | च | वी | १४ स |
| १५ ज | रा | सं | ध | ■ | ■ | व्वी |
| ना | ■ | ■ | १६ रा | म | दा | स |



।। तू ही निरंकार ।।

# वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
# प्रेमाचे पूल बांधत जाऊया



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

सद्‌गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

१९१, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

